आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 18/10/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 221 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# दिवाळीपूर्वी मोठे आंदोलन उभारणार-रोहित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : राज्यातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. खरीप हंगामातील पेरणी कमी झाल्यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत सरकारने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदत म्हणजे शेतकऱ्यांची क्रूर थट्टा असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली.**



शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी दिवाळीपूर्वी मोठे आंदोलन उभारून सरकारला जाब विचारणार असून, यंदा सरकारला दिवाळी साजरी करू देणार नाही, असा आक्रमक इशाराही त्यांनी दिला.आमदार रोहित पवार यांनी शनिवारी पुणे श्रमिक पत्रकार संघात माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती, पावसाची तूट, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान, पीक उत्पादनातील संभाव्य घट आणि सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या मदतीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या तुलनेत सरकारकडून दिली जाणारी मदत अत्यंत अपुरी असल्याचे सांगत त्यांनी राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली.

रोहित पवार म्हणाले की, राज्यातील अनेक भागांत सरासरीच्या तुलनेत अत्यल्प पाऊस झाला आहे. त्यामुळे आगामी काळ शेतकऱ्यांसाठी अत्यंत कठीण असणार आहे. कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात सरासरीच्या तुलनेत केवळ 30 टक्के, नाशिक विभागात 34 टक्के, तर पुणे विभागात 31 टक्के पाऊस झाल्याची माहिती त्यांनी दिली. पावसाच्या कमतरतेमुळे पिकांच्या वाढीवर परिणाम झाला असून, शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

पुणे जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा 93 टक्क्यांवरून 81 टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. तसेच उजनी धरणातील पाणीसाठा 80 टक्के असल्याचे त्यांनी सांगितले. पावसाची तूट आणि उपलब्ध पाणीसाठ्याची परिस्थिती लक्षात घेता शेती आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. या परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी आपण विविध तालुक्यांना भेटी दिल्या असून, शेतकरी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याचे पवार यांनी सांगितले.

# पुण्यात 'लहरा दो तिरंगा' आंदोलन!

## 'लोकशाही वाचवा, संविधान वाचवा'च्या घोषणा; सीजेपीच्या सुमारे 200 तरुण-तरुणींचा सहभाग

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : दिल्लीतील आंदोलनादरम्यान पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना झालेल्या अटकेच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) वतीने शनिवारी (दि. 17 ऑक्टोबर) पुण्यात 'लहरा दो तिरंगा' आंदोलन करण्यात आले. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याची मागणी करत आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. तसेच एसआयआर प्रक्रिया रद्द करण्याची आणि मुख्य निवडणूक आयुक्तांना अटक करण्याची मागणी करत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.**



जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ हे आंदोलन करण्यात आले. यामध्ये सुमारे 200 तरुण-तरुणींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. आंदोलकांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन 'लोकशाही वाचवा', 'संविधान वाचवा' अशा घोषणा दिल्या. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित करत आंदोलकांनी केंद्रस्थानी असलेल्या निवडणूक यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

शनिवारी दुपारी चार ते सायंकाळी सात या वेळेत हे आंदोलन सुरू होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी परिसरात बंदोबस्त ठेवला होता. दिल्लीतील आंदोलनादरम्यान पक्षाच्या पदाधिकाऱ्यांवर झालेल्या कारवाईचा निषेध नोंदवतानाच त्यांच्या समर्थनार्थ पुण्यातील कार्यकर्त्यांनी एकजूट दाखवली.

कॉकरोच जनता पार्टीचे सह-संयोजक आशुतोष रांका आणि सौरव दास यांना दिल्लीतील आंदोलनादरम्यान शांतता भंग आणि घुसखोरीच्या आरोपांवरून अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याने तिहार कारागृहात पाठविण्यात आले आहे. या कारवाईच्या निषेधार्थ आणि संबंधित पदाधिकाऱ्यांना समर्थन देण्यासाठी पक्षाच्या वतीने विविध शहरांमध्ये आंदोलनांचे आयोजन करण्यात आले.

या अटकेच्या निषेधार्थ पुण्यातही कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसह लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणाचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी सरकार आणि निवडणूक यंत्रणेविरोधात घोषणाबाजी केली.

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त बी. जे. एस. कॉलेजमध्ये युनूस सय्यद यांचा सन्मान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून वाघोली येथील बी. जे. एस. कॉलेजमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कॅन्सरवर मात करणारे आणि राज्य शासन पुरस्कारप्राप्त लेखक युनूस सय्यद यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल युनूस सय्यद यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्या, समन्वयक, शिक्षकवृंद तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाशी संबंधित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले.**



वाचन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करणे, विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांविषयी आवड निर्माण करणे आणि वाचनातून ज्ञान, विचार व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे, हा वाचन प्रेरणा दिनाचा प्रमुख उद्देश आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या जीवनातून शिक्षण, ज्ञान, संशोधन आणि वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून वाचन संस्कृती जपण्याचा आणि ती नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संदेश देण्यात आला.या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सहभागी होण्याची संधी मिळाल्याबद्दल युनूस सय्यद यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैचारिक जडणघडणीत वाचनाची भूमिका महत्त्वाची असल्याचे या उपक्रमाच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले. वाचनामुळे माणसाच्या विचारांना दिशा मिळते, ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात आणि जीवनातील विविध आव्हानांना सामोरे जाण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील पुस्तकांसोबतच विविध विषयांवरील साहित्याचेही नियमित वाचन करावे, हा या दिवसाचा व्यापक संदेश आहे.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन आणि सुंदर आदरातिथ्य केल्याबद्दल युनूस सय्यद यांनी बी. जे. एस. कॉलेजच्या प्राचार्या मनिषा बोरा मॅडम, समन्वयक गौरी मॅडम आणि महाविद्यालयातील संपूर्ण शिक्षकवृंदाचे विशेष आभार मानले. तसेच पुणे बुक फेस्टिव्हलचे आयोजक राजेश पांडे आणि नॅशनल बुक ट्रस्टचे (NBT) समन्वयक आव्हाड सर यांचेही त्यांनी कृतज्ञतापूर्वक आभार व्यक्त केले.कॅन्सरवर मात करून साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या आणि राज्य शासन पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या युनूस सय्यद यांचा या कार्यक्रमातील सहभाग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. वाचन, ज्ञान आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या माध्यमातून जीवन समृद्ध करण्याचा संदेश अशा उपक्रमांतून अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचतो.

# आता प्रत्येक गोष्ट स्मार्ट हवी : गोयल

## खडकी शिक्षण संस्थेत 'स्मार्ट युनिट' व 'स्मार्ट क्लासरुम' स्पर्धा पारितोषिक वितरण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : 'सध्याच्या स्पर्धेच्या युगात स्मार्ट राहण्याबरोबरच स्मार्ट वागण्याची, स्मार्ट बोलण्याची, कोणतीही गोष्ट स्मार्टपणे करण्याची सवय लावून घ्यायला हवी,' असे मत खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी व्यक्त केले.**




खडकी शिक्षण संस्थेने राबविलेल्या 'स्मार्ट युनिट' व 'स्मार्ट क्लासरुम' स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. वरिष्ठ पत्रकार निरंजन आगाशे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी सचिव आनंद छाजेड यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते. वृक्षाला जल अर्पण करून कार्यक्रमाचा प्रारंभ ही नवसंकल्पना या कार्यक्रमात रुजवण्यात आली.'मुलांनी मोबाइल वापरायला हरकत नाही. मात्र, त्याचा शिक्षणासाठी कसा वापर करायचा याचे तंत्र आत्मसात करणे आवश्यक आहे,' असेही गोयल यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले.

स्मार्ट युनिट स्पर्धेत खडकी शिक्षण संस्थेच्या 11 शाखांपैकी चेतन दत्ताजी गायकवाड इंग्लिश मीडियम स्कूलला प्रथम, आलेगावकर प्राथमिक व बालशिक्षण मंदिरला द्वितीय, तर आलेगावकर माध्यमिक विद्यालयाला तृतीय क्रमांक मिळाला. स्मार्ट क्लासरुम स्पर्धेत सी. के. गोयल कॉलेजच्या बारावी कॉमर्सच्या (ई) वर्गाने प्रथम, जीएमआय कन्याशाळेच्या आठवीच्या वर्गाने द्वितीय, तर टी. जे. कॉलेजच्या इतिहास विभागाच्या वर्गाने तृतीय क्रमांक पटकावला. 15 परीक्षकांच्या तीन समित्यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. प्रा. सुग्रीव सावंत व प्रा. मंगेश दळवी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. वैशाली वाघ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर संस्थेचे सीईओ उत्तमकुमार इंदोरे यांनी आभार मानले.

बदलत्या काळाची पावले ओळखून संस्थेत घडणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती संस्थेच्याच न्यूज चॅनेलमार्फत प्रसारित करता यावी, संस्थेतील तज्ज्ञ शिक्षकांच्या मुलाखती प्रसारित करता याव्यात, यासाठी गिरीश ननावरे यांच्या संकल्पनेतून KESLive या न्यूज चॅनेलची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचे लोकार्पणही संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते झाले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 18/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# बनावट ट्रेडिंग ॲपद्वारे 86 लाखांची फसवणूक; नऊ जणांवर मकोका

## सहा जणांना अटक, 28 लाख रुपये परत मिळण्याचा मार्ग मोकळा

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी-चिंचवड : बनावट ट्रेडिंग ॲपद्वारे शेअर बाजारातील गुंतवणुकीवर मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून ज्येष्ठ नागरिकाची 86 लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सायबर गुन्हे करणाऱ्या संघटित टोळीतील नऊ आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी सहा आरोपींना अटक करण्यात आली असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी 2026 मध्ये सायबर गुन्हेगारांविरुद्ध मकोकाअंतर्गत केलेली ही दुसरी कारवाई आहे.**




पिंपरी-चिंचवड सायबर पोलिस ठाण्यात 17 जुलै 2026 रोजी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान फसवणुकीची रक्कम विविध बँक खात्यांत वर्ग करण्यात आल्याचे उघड झाले. पोलिसांनी संबंधित खात्यांमधील 28 लाख रुपये गोठवले असून, ही रक्कम फिर्यादीला परत मिळण्यासाठी न्यायालयाकडून आदेश प्राप्त झाले आहेत.

पोलिसांनी तपासादरम्यान पुणे, लातूर, अहिल्यानगर, नवी मुंबई आणि हैदराबाद येथील आरोपींचा शोध घेतला. या प्रकरणात तेजस ज्ञानोबा लोखंडे, अविनाश ज्ञानोबा बाकलिकर, हर्षल दिलीप बोरा, सोनू हरिष शर्मा, ॲलेक ऊर्फ गौरव रमेश गाडगे आणि आखील श्रीनिवासराव नेल्लुरी या सहा जणांना अटक करण्यात आली आहे. अन्य आरोपींचा शोध सुरु आहे.

अटक आरोपींचा कंबोडियातील मुख्य आरोपीशी संपर्क असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून शेअर बाजारात गुंतवणुकीच्या नावाखाली अधिक परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचेही तपासात समोर आले आहे.

या टोळीतील सदस्यांनी संघटितपणे आर्थिक फायद्यासाठी गुन्हे केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. फसवणुकीतून मिळालेली रक्कम यूएसडीटीसारख्या आभासी चलनात वर्ग करण्यात येत असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या टोळीतील आरोपींविरुद्ध पिंपरी-चिंचवड, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर तसेच गुजरातमध्ये विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचेही प्रेस नोटमध्ये म्हटले आहे. यामध्ये फसवणूक, अपहरण, खंडणी, दरोडा, अमली पदार्थांची तस्करी आणि बनावट कागदपत्रे तयार करण्यासारख्या गुन्ह्यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# दांडिया पाहायला गेलेल्या तरुणावर जीवघेणा हल्ला; दोघांना अटक

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**बौद्धनगरमधील गिरजुबाबा मंदिराजवळ दांडिया पाहण्यासाठी गेलेल्या तरुणावर जुन्या वादातून हत्यारांनी हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात तरुणाच्या हाताला गंभीर दुखापत झाल्याचे पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.**




पोलिसांच्या नोंदीनुसार, यश बाळासाहेब गायकवाड यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. 14 ऑक्टोबर 2026 रोजी रात्री सुमारे 8.45 वाजता गिरजुबाबा मंदिराजवळ, बौद्धनगर परिसरात ही घटना घडली.फिर्यादी दांडिया पाहण्यासाठी गेले असताना आरोपींनी त्यांना अडवून मारहाण केल्याचा आरोप आहे.

आरोपींनी कोयता, पालघन आणि बांबूसारख्या वस्तूंचा वापर करून हल्ला केल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीने वार अडवण्याचा प्रयत्न केल्याने त्यांच्या उजव्या हाताच्या मनगटाला गंभीर दुखापत झाली. तसेच पाठीवरही वार करण्यात आल्याचे पोलिसांच्या नोंदीत म्हटले आहे.

या घटनेत भगवान नरहरी माने, साहिल माने, निखिल माने, एक महिला आरोपी आणि विकास माने यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यापैकी भगवान माने आणि महिला आरोपीला अटक करण्यात आली आहे.हल्ल्यानंतर परिसरात दहशत निर्माण झाल्याने नागरिक पळून गेल्याचा उल्लेखही तक्रारीत आहे. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 956/2026 दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# किवळे गावाच्या स्मशानभूमीत विद्युत दाहिनी उभारण्याची मागणी

## नगरसेविका ऐश्वर्या तरस यांचे महापालिकेच्या विद्युत विभागाला निवेदन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**किवळे गावातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता, येथील स्मशानभूमीत विद्युत दाहिनी उभारण्यात यावी, अशी मागणी प्रभाग क्रमांक 16 च्या नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिकेच्या विद्युत विभागाच्या सहशहर अभियंत्यांना निवेदन दिले असून, पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात विद्युत दाहिनीसाठी आर्थिक तरतूद करून आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे.**

किवळे गाव परिसराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी आधुनिक, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.सध्या पारंपरिक पद्धतीने अंत्यसंस्कार करताना पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी विद्युत दाहिनी उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे किवळे गावातील स्मशानभूमीत ही सुविधा उभारल्यास नागरिकांना सन्मानपूर्वक आणि सुलभ पद्धतीने अंत्यसंस्कार करता येतील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.विद्युत दाहिनीमुळे अंत्यसंस्काराची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासोबतच पर्यावरणाचे संरक्षण करण्यासही मदत होईल. वाढत्या नागरीकरणाच्यापार्श्वभूमीवरस्मशान भूमीं मध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे नगरसेविका तरस यांनी म्हटले आहे.या मागणीचा सकारात्मक विचार करून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने आगामी आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात विद्युत दाहिनी उभारण्यासाठी निधीची तरतूद करावी आणि त्यानंतर आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी व्यक्त केली आहे.आता महापालिका प्रशासन या मागणीची दखल घेऊन किवळे गावातील नागरिकांना आधुनिक अंत्यसंस्कार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काय निर्णय घेते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.



# महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाचा निर्धार - आ. प्रसाद लाड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड: आगामी पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीचे नियोजन, रणनीती आणि मतदार नोंदणीचा आढावा घेण्यासाठी आज पिंपरी विधानसभेमध्ये भारतीय जनता युवा मोर्चा सर्व पदाधिकाऱ्यांची युवा मोर्चाच्या वतीने अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.**

ही बैठक पिंपरी विधानसभा प्रभारी तथा आमदार प्रसाद लाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी आमदार अमित गोरखे यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ. सौ. स्मिताताई जाधव (पुणे पदवीधर मतदारसंघ) आणि कौस्तुभ गावडे (पुणे शिक्षक मतदारसंघ) यांच्या विजयाचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीस पिंपरी विधानसभा प्रभारी आमदार प्रसादजी लाड, सहप्रभारी आमदार सौ. स्नेहाताई दुबे, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, भाजपा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आणि पिंपरी-चिंचवड शिक्षक मतदारसंघ निवडणूक संयोजक सदाशिव खाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी, पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी बूथ स्तरावर गांभीर्याने काम करण्याचे आवाहन केले. तसेच प्रत्येक पदवीधर आणि शिक्षक मतदारांपर्यंत पोहोचून राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती पोहोचवण्यावर भर दिला जावा, असे निर्देशही त्यांनी दिले.